आधुनिक शहरातील घडामोडी

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

e Paper

वर्ष 4थे

www.metrocityvrutant.in मंगळवार दिनांक 24/02/२०२६ METRO CITY VRUTANT

संपादक : रफी हुसेन || पिंपरी चिंचवड व पुणे || पान 4 || अंक 69 || RNI - MAHMAR /2021/51259 || metrocity924@gmail.com

# कहा तुम चले गये...

# अजित दादांना भावपूर्ण श्रद्धांजली!

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**मुंबईतील वरळी डोम येथे दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांची शोकसभा अत्यंत शोकाकुल वातावरणात पार पडली. 28 जानेवारी 2026 रोजी झालेल्या विमान अपघातात त्यांच्या निधनानंतर राष्ट्रवादी काँग्रेससह विविध राजकीय पक्षांच्या नेत्यांनी उपस्थित राहून त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली.**



## वरळी डोम येथे अजित पवार यांची शोकसभा संपन्न

या शोकसभेला राज्याचे राज्यपाल आचार्य देवव्रत, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, विधानसभेचे अध्यक्ष राहुल नार्वेकर, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार माजी सरन्यायाधीश भुषण गवई, सुनिल तटकरे, प्रफुल पटेल, मंत्री छगन भुजबळ, माजी मुख्यमंत्री सुशिलकुमार शिंदे, अजित पवार यांचे पुत्र पार्थ पवार व जय पवार तसेच पवार कुटुंबीय आणि सर्वपक्षीय नेते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आपल्या भावना व्यक्त करताना सांगितले, “आपल्यापैकी कोणीही अशी वेळ येईल, याची कल्पना केली नव्हती. दुर्दैवाने आज आपण अजितदादांना श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी एकत्र आलो आहोत. महाराष्ट्राच्या जडणघडणीत त्यांचा मोठा वाटा आहे. त्यांनी ‘जनतेचा नेता’ अशी प्रतिमा निर्माण केली होती.राज्याच्या कानाकोपऱ्याची त्यांना अचूक माहिती असायची. प्रत्येक तालुक्यापर्यंतच्या घडामोडींवर त्यांची पकड होती. ते अत्यंत सक्षम आणि कुशल प्रशासक होते.”

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी भावना व्यक्त करत सांगितले की, अजित पवार यांनी 1991 पासून अनेक महत्त्वाची पदे भूषविली. ते स्पष्टवक्ते होते आणि आपली मते परखडपणे मांडत असत. राज्याच्या विकासाचा ध्यास त्यांनी कायम ठेवला होता. शिंदे पुढे म्हणाले की, आम्ही तिघे (देवेंद्र फडणवीस, अजितदादा) एकमेकांच्या मनातील गोष्टी सहज ओळखत होतो.आमचे बॉन्डिंग अतिशय घट्ट आणि समन्वयपूर्ण होते. मात्र दुर्दैवाने, काळाच्या मनातील संकेत आम्हाला ओळखता आले नाहीत.

प्रफुल पटेल म्हणाले, “दादांच्या शोकसभेला अशा प्रकारे एकत्र यावे लागेल, असे कधी वाटले नव्हते. त्यांच्या निधनानंतर महाराष्ट्रासह देशभरातील लाखो लोकांनी अश्रू ढाळले. यावरून त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची उंची लक्षात येते. आज आपण इतक्या मोठ्या संख्येने येथे जमलो आहोत, हीच त्यांना खरी श्रद्धांजली आहे.”

छगन भुजबळ यांनीही अत्यंत भावनिक शब्दांत श्रद्धांजली वाहिली. “आयुष्यात अनेक शोकसभांना गेलो; परंतु दादांच्या शोकसभेला उपस्थित राहावे लागेल, असे कधी वाटले नव्हते. ज्या वयात आणि ज्या पद्धतीने ते आपल्यातून निघून गेले, तो मोठा धक्का आहे. देशातील लाखो लोक आज हळहळ व्यक्त करत आहेत.दादांबद्दल प्रत्येकाच्या मनात अपार प्रेम आहे. अत्यल्प काळात त्यांनी मोठी कामगिरी उभी केली. प्रत्येक ठिकाणी वेळेवर पोहोचणारे दादा आज मात्र अवेळी का निघून गेले?” असे म्हणताना ते गहिवरून गेले.

जयंत पाटील यांनी आपल्या भाषणात एका हिंदी गीताच्या ओळी म्हणत दादांची



आठवण जागवली, “चिठ्ठी ना कोई संदेश, जाने वो कौन सा देश, जहाँ तुम चले गए....”. ते पुढे म्हणाले, “सकाळी सहा वाजल्यापासून रात्री दहा वाजेपर्यंत काम करणारा नेता क्वचितच पाहायला मिळतो. विकासकामे पाहायची असतील, तर बारामतीला जाऊन पाहावे.त्यांनी केवळ मतदारसंघ नव्हे, तर संपूर्ण राज्याची बांधणी केली.” शेवटी त्यांनी, “इक आह भरी होगी... जाते जाते तुमने, आवाज़ तो दी होगी...” या ओळी उच्चारत भावनांना वाट मोकळी करून दिली.

अभिनेते नाना पाटेकर यांनी सांगितले, “गेल्या पन्नास वर्षांपासून माझे अजितदादांशी जिव्हाळ्याचे संबंध होते. आज इतकी मंडळी येथे जमली आहेत; परंतु हीच मंडळी त्यांच्या पंच्याहत्तराव्या वाढदिवसानिमित्त जमली असती, तर अधिक समाधान वाटले असते.” असे म्हणत त्यांना अश्रू अनावर झाले.

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत
मंगळवार दिनांक 24/02/2026
पिंपरी चिंचवड | पुणे
e Paper

# महापौर रवि लांडगे यांचे रात्रीच्या स्वच्छता मोहिमेत महिलांची शिफ्ट बंद करण्याचे निर्देश

## महापौर रवि लांडगे यांनी घेतली आरोग्य विभागाची घेतली आढावा बैठक...

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी चिंचवड शहरात सुरु असलेल्या रात्रीच्या स्वच्छता उपक्रमासह आरोग्य विभागाच्या कामकाजाचा आढावा महापौर रवि लांडगे यांनी आज घेतला. यावेळी रात्रीच्या स्वच्छता मोहिमेत महिलांची शिफ्ट बंद करण्यात यावी, असे निर्देश त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले. संबंधित अधिकाऱ्यांकडून उपक्रमाचे फायदे जाणून घेतल्यानंतर रात्रीची स्वच्छता मोहीम सुरु ठेवावी; मात्र त्यामध्ये केवळ पुरुष कर्मचाऱ्यांचा सहभाग ठेवावा, असेही ते म्हणाले. महिलांच्या सुरक्षेच्या दृष्टीने हा निर्णय घेण्यात आल्याचे त्यांनी नमूद केले.**



शहरात उघड्यावर कचरा टाकणाऱ्यांवर कठोर दंडात्मक कारवाई करावी, असेही निर्देश त्यांनी दिले. शहर स्वच्छ ठेवणे ही प्रशासनासोबत नागरिकांचीही जबाबदारी आहे. नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई करावी. त्याचबरोबर शहरातील स्वच्छतेचा रोडमॅप तयार करण्यात यावा, असेही त्यांनी सांगितले. महापालिकेच्या दिवंगत मधुकर पवळे सभागृहात आरोग्य विभागाची आढावा बैठक पार पडली. यावेळी ते बोलत होते.

यावेळी आरोग्य विभागाच्या वतीने शहरातील कचरा संकलन, कचऱ्याचे विलगीकरण, त्याची वाहतूक, सार्वजनिक स्वच्छतागृहे, रस्ते साफसफाई, पाणी स्वच्छता यासह विविध आरोग्यविषयक योजनांची सविस्तर माहिती देण्यात आली. बैठकीस महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे, उपायुक्त डॉ. प्रदीप ठेंगल, सहाय्यक आयुक्त किरणकुमार मोरे, क्षेत्रीय अधिकारी तानाजी नरळे, अतुल पाटील, किशोर ननवरे, अजिंक्य येळे, राजाराम सरगर, निवेदिता घार्गे, अश्विनी गायकवाड, पूजा दूधनाळे, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक यांच्यासह आरोग्य निरीक्षक व आरोग्य विभागाचे कर्मचारी उपस्थित होते.

तसेच अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे यांनीही आरोग्य विभागाच्या संबंधित विविध विषयांचा आढावा घेत संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक त्या सूचना दिल्या. तसेच उपायुक्त डॉ. प्रदीप ठेंगल यांनी आरोग्य विभागाच्या कामकाजाबाबत सविस्तर माहिती देत येणाऱ्या अडचणी मांडल्या. मनुष्यबळ, वाढती लोकसंख्या आणि काही भागांतील अंमलबजावणीतील अडथळे यावर त्यांनी प्रकाश टाकला. या सर्व बाबींवर प्रभावी उपाययोजना करून शहरातील स्वच्छता व आरोग्य व्यवस्था अधिक सक्षम करण्याचे निर्देश बैठकीत देण्यात आले.

### 'माझी वसुंधरा' पुरस्कार मिळाल्याबद्दल केले अभिनंदन

पिंपरी चिंचवड महापालिकेला 'माझी वसुंधरा' हा मानाचा पुरस्कार मिळाल्याबद्दल आरोग्य विभागातील सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांचे महापौरांनी अभिनंदन केले. हा पुरस्कार केवळ सन्मान नसून मोठी जबाबदारी असल्याचे सांगत पर्यावरण संवर्धन, स्वच्छता आणि शाश्वत विकासाच्या दिशेने सातत्याने काम करण्याचे आवाहन त्यांनी केले.

# 28 व्या विश्वबंधुता साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी बंधुताचार्य प्रकाश रोकडे

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत



बंधुताचार्य प्रकाश रोकडे



डॉ. मनीषा बोरा



प्रा. शरयू पवार

पुणे: विश्वबंधुता साहित्य परिषद, भारतीय जैन संघटनेचे वाघोली येथील महाविद्यालय आणि काषाय प्रकाशन पुणे या संस्थांच्या वतीने आयोजित 28 व्या विश्वबंधुता साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी ज्येष्ठ साहित्यिक आणि विचारवंत बंधुताचार्य प्रकाश रोकडे यांची निवड करण्यात आली आहे. 12 एप्रिल 2026 रोजी नवी पेठेतील एस. एम. जोशी सभागृहात हे संमेलन होणार आहे. संमेलनाच्या कार्याध्यक्षपदी प्राचार्य डॉ. मनीषा बोरा, तर स्वागताध्यक्षपदी साहित्यिक प्रा. शरयू पवार यांची नियुक्ती करण्यात आली आहे, अशी माहिती परिषदेचे सरचिटणीस प्रा. शंकर आथरे यांनी दिली.

प्रा. शंकर आथरे म्हणाले, "प्रकाश रोकडे यांनी गेल्या पाच दशकांपासून केलेल्या बंधुता, राष्ट्रबंधुता आणि विश्वबंधुता या अखंड कार्याचा, साहित्य आणि सांस्कृतिक सेवेचा हा सन्मान आहे. त्यांच्या 'अर्थशोध आणि बोध', 'मी पाण्याच्या जातीचा', 'आरपार बंधुता', 'बंधुतापर्व', 'प्रकाशपर्व' 'बंधुताचार्यांची प्रकाशगाथा' अशा साहित्यकृती प्रकाशित झालेल्या आहेत. राष्ट्रीय बंधुता साहित्य संमेलन, रयत विचारवेध संमेलन आणि लोककवी वामनदादा कर्डक महाकाव्य संमेलनाचे अध्यक्षपदही त्यांनी भूषविले आहे. डॉ. मनीषा बोरा आणि प्रा. शरयू पवार यांनी शैक्षणिक क्षेत्रात मौलिक योगदान दिले असून, विविध विषयांवरील त्यांचे वैचारिक लेखनही प्रकाशित झाले आहे."

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

मंगळवार दिनांक 24/02/२०२६

पिंपरी चिंचवड | पुणे

e Paper

# तरुणीची हत्या;आत्महत्येचा बनाव करून आरोपी फरार

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**आळंदी पोलीस ठाण्याच्या हद्दीत साठू गाव परिसरातील जंगलात तरुणीची निर्घृण हत्या करून आत्महत्येचा बनाव केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे.**




या प्रकरणी विष्णू महादेव पावडे (वय 32, रा. धानोरे ता. खेड जि. पुणे, मूळ रा. हातगाव ता. पैलु जि. परभणी) यास अटक करण्यात आली असून आळंदी पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक 78/2026 नुसार बी.एन.एस. कायदा 2023 चे कलम 103 (2), 238 (क) (अ) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, दि. 20 फेब्रुवारी 2026 रोजी दुपारी 3 वाजण्याच्या सुमारास आरोपी व मृत महिला (वय 30) हे दोघे कामानिमित्त एकत्र घरातून बाहेर पडले होते.

त्यानंतर मोटारसायकलवरून साठू गावाजवळील डोंगरावरील जंगलात गेले असता, अज्ञात कारणावरून आरोपीने मृत महिलेस कपटाने गळा आवळून जिवे ठार मारले.

हत्या केल्यानंतर गुन्हा लपविण्याच्या उद्देशाने व आत्महत्येचा बनाव निर्माण करण्यासाठी आरोपीने मृतदेह जंगलातील एका झाडाला जमिनीपासून सुमारे चार फूट उंचीवर स्कार्फच्या साहाय्याने बसलेल्या स्थितीत बांधून ठेवला व तिने आत्महत्या केली असल्याचा आभास निर्माण केला. त्यानंतर आरोपी घटनास्थळावरून पळून गेला. या प्रकरणाचा तपास आळंदी पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक कुमार कोडीबा गिरीगोसमावी (वय 39) यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आला असून पुढील तपास सुरु आहे.

# सरस्वती माध्यमिक विद्यालयात चिंतनदिन उत्साहात साजरा

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**आकुर्डी येथील सरस्वती माध्यमिक विद्यालय येथे स्काऊट-गाईड चळवळीचे जनक लॉर्ड बेडन पॉवेल व लेडी बेडन पॉवेल यांच्या संयुक्त जयंतीनिमित्त 22 फेब्रुवारी रोजी चिंतनदिन (विचारदिन) मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.**




इयत्ता 1 ली ते 7 वी मधील कब, बुलबुल, स्काऊट आणि गाईड विद्यार्थ्यांनी विविध उपक्रमांद्वारे हा दिवस साजरा केला. कार्यक्रमासाठी संस्थेचे संस्थापक डॉ. श्री. गोविंदराव दाभाडे सर अध्यक्षस्थानी होते, तर श्री स्वामी विवेकानंद माध्यमिक विद्यालय, यमुनानगरचे मुख्याध्यापक हेमंत अभोणकर सर यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

7 व 8 फेब्रुवारी 2026 रोजी चिंचवड येथील श्री जैन फत्तेचंद विद्यालय येथे झालेल्या जिल्हास्तरीय स्काऊट-गाईड मेळाव्यात विद्यालयाच्या समूहाने उल्लेखनीय कामगिरी केली. नृत्य स्पर्धेत द्वितीय क्रमांक, तंबू सुशोभीकरण स्पर्धेत तृतीय क्रमांक आणि शोभायात्रेत उत्तेजनार्थ पारितोषिक मिळवले.

या यशस्वी विद्यार्थ्यांचा ट्रॉफी व प्रमाणपत्र देऊन मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. तसेच सर्व सहभागी विद्यार्थ्यांना सहभाग सन्मानपत्र प्रदान करण्यात आले. माननीय मोठे सरांनी विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व निवेदन कैलास कोशिरे सर यांनी केले, तर शिक्षक मनोगत व आभार प्रदर्शन सौ. प्रतिमा काळे मॅडम यांनी व्यक्त केले. विद्यार्थी व शिक्षकांनी सर्वधर्मीय प्रार्थना सादर करून एकात्मतेचा संदेश दिला.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सौ. भारती भोंगाडे, योगेश पाटील व अमोल गुंड सर यांनी मोलाचे सहकार्य केले. चिंतनदिनानिमित्त विद्यार्थ्यांमध्ये शिस्त, सेवा आणि बंधुभावाची भावना अधिक दृढ झाल्याचे चित्र यावेळी पाहायला मिळाले.

# इंद्रायणी नदी स्वच्छतेसाठी महापौर रवि लांडगे यांचा प्रत्यक्ष सहभागातून पुढाकार

## प्रदूषणास कारणीभूत कंपन्या व संस्थांवर कडक कारवाईचे दिले संकेत

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी - पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या हद्दीतून इंद्रायणी नदीत प्रदूषण करणाऱ्या संबंधित कंपन्या व संस्थांवर प्रशासनामार्फत कडक कारवाई करण्यात येणार असून पर्यावरणीय नियमांचे उल्लंघन कोणत्याही परिस्थितीत सहन केले जाणार नाही. इंद्रायणी नदी स्वच्छ आणि प्रदूषणमुक्त ठेवण्यासाठी प्रशासनासोबतच नागरिकांनीही सामूहिक जबाबदारी स्वीकारून पुढाकार घेणे आवश्यक आहे, असे मत महापौर रवि लांडगे यांनी व्यक्त केले.**



पिंपरी चिंचवड महानगरपालिका महापौर रवि लांडगे,आळंदी नगरपरिषदेचे नगराध्यक्ष प्रशांत कु-हाडे, यांच्या उपस्थितीत सात मावळे संवर्धन संस्थेमार्फत इंद्रायणी नदी स्वच्छता अभियान राबविण्यात आले. या अभियानाचा मुख्य उद्देश इंद्रायणी नदीतील वाढत्या प्रदूषणाच्या समस्येकडे लक्ष वेधणे तसेच नदी स्वच्छतेसाठी सामूहिक जबाबदारीची जाणीव निर्माण करणे हा होता.

या स्वच्छता मोहिमेदरम्यान महापौर लांडगे यांनी स्वतः इंद्रायणी नदीच्या पात्रात उतरून स्वच्छता उपक्रमात सक्रिय सहभाग नोंदविला. प्रत्यक्ष पाहणी करताना नदीपात्रात मोठ्या प्रमाणावर साचलेला कचरा, औद्योगिक सांडपाणी, प्लास्टिक कचरा तसेच इतर घातक घटकांची त्यांनी पाहणी करून नदीच्या प्रदूषणामागील संभाव्य कारणांचा त्यांनी प्रत्यक्ष आढावा घेतला, त्यावेळी ते बोलत होते. या पाहणीनंतर महापौर लांडगे यांनी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या हद्दीतून इंद्रायणी नदीत सोडण्यात येणारे प्रदूषित सांडपाणी, औद्योगिक कचरा आणि पर्यावरणास हानिकारक घटक यांस जबाबदार असलेल्या संबंधित कंपन्या तसेच इतर संस्थांवर प्रशासनामार्फत कडक कारवाई करण्यात येणार असल्याचे संकेत दिले.

इंद्रायणी नदीचे पावित्र्य आणि पर्यावरणीय समतोल राखण्यासाठी प्रशासन, सामाजिक संस्था आणि नागरिक यांनी एकत्रितपणे पुढाकार घेण्याची गरज असल्याचे मत यावेळी त्यांनी व्यक्त केले. याशिवाय या स्वच्छता अभियानामुळे नदी संवर्धनाच्या दिशेने सकारात्मक पाऊल उचलले गेले असून भविष्यात अशा मोहिमा सातत्याने राबविण्यात येणार असल्याचेही प्रशासनातर्फे सांगण्यात आले.

या उपक्रमात सात मावळे संवर्धन संस्थेचे पदाधिकारी, स्थानिक नागरिक तसेच महानगरपालिकेचे अधिकारी व कर्मचारी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. इंद्रायणी नदी स्वच्छ आणि प्रदूषणमुक्त करण्यासाठी अशा लोकसहभागातून राबविण्यात येणाऱ्या मोहिमांना भविष्यात अधिक गती तसेच प्रोत्साहन दिले जाईल असे देखील महापौर लांडगे यांनी यावेळी सांगितले.

# रेड जायंट मूव्हीजच्या 'KHxRK'मुळे 47 वर्षांनंतर कमल हासन आणि रजनीकांत एकत्र

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**रेड जायंट मूव्हीजच्या आगामी चित्रपट 'KHxRK' मुळे भारतीय चित्रपटसृष्टी एक ऐतिहासिक क्षण अनुभवणार आहे. या चित्रपटाच्या माध्यमातून भारतीय सिनेमातील दोन सर्वात मोठे आणि प्रतिष्ठित दिग्गज कमल हासन आणि रजनीकांत, तब्बल 47 वर्षांनंतर पुन्हा एकत्र पडद्यावर झळकणार आहेत.**



उल्लेखनीय बाब म्हणजे या दोन्ही महान कलाकारांनी शेवटचे एकत्र काम 1970 च्या दशकात केले होते. जवळपास पाच दशकांनंतर त्यांचे पुन्हा एकत्र येणे हे भारतीय चित्रपट इतिहासातील अत्यंत महत्त्वाच्या घटनांपैकी एक मानले जात आहे. कारण हा चित्रपट अशा दोन वारशांचा संगम आहे, ज्यांनी केवळ भारतातच नव्हे तर जागतिक स्तरावरही पिढ्यान्पिढ्या प्रेक्षकांवर खोल प्रभाव टाकला आहे.

सध्या या चित्रपटाची निर्मिती रेड जायंट मूव्हीज करत आहे. या दोन सिनेमाई दिग्गजांना एकत्र आणण्याचे स्वप्न या प्रोडक्शन हाऊसने साकार केले आहे. विशेष म्हणजे, या चित्रपटाकडे भव्यता, वारसा आणि उत्कृष्ट कथाकथनाचा उत्सव म्हणून पाहिले जात आहे.

या ऐतिहासिक क्षणाबद्दल रेड जायंट मूव्हीजच्या एका प्रवक्त्याने सांगितले, "कमल हासन सर आणि रजनीकांत सर यांना या चित्रपटासाठी एकत्र आणणे हे आमच्यासाठी स्वप्नपूर्तीप्रमाणे आहे. या ऐतिहासिक क्षणाचा भाग होण्याचा आम्हाला अभिमान, कृतज्ञता आणि प्रचंड उत्साह वाटतो. हा भारतीय सिनेमासाठी भावनिक आणि ऐतिहासिक क्षण आहे. त्यांच्या अतुलनीय योगदानाचा आणि वारशाचा सर्वोत्तम पद्धतीने सन्मान करणे, हाच आमचा उद्देश आहे."

या चित्रपटाचे दिग्दर्शन प्रसिद्ध दिग्दर्शक नेल्सन दिलीपकुमार करत आहेत. त्यांनी नुकत्याच आलेल्या ब्लॉकबस्टर जेलर मुळे प्रचंड यश मिळवत स्वतःला देशातील आघाडीच्या कमर्शियल दिग्दर्शकांमध्ये स्थान मिळवून दिले आहे. चित्रपटाचे संगीत सुप्रसिद्ध संगीतकार अनिरुद्ध रविचंदर यांनी दिले आहे, ज्यांचे संगीत अनेक ब्लॉकबस्टर चित्रपटांना नव्या उंचीवर घेऊन गेले आहे.

कमल हासन आणि रजनीकांत यांच्या दमदार अभिनयाने सजलेला 'KHxRK' हा चित्रपट तमिळ, तेलुगू आणि हिंदी अशा तीन भाषांमध्ये भव्य स्वरूपात प्रदर्शित होणार आहे.

चित्रपटाशी संबंधित इतर तपशील सध्या गुप्त ठेवण्यात आले असून, योग्य वेळी अधिकृतरीत्या जाहीर केले जातील. मात्र एवढे निश्चित आहे की 'K H x R K' भारतीय चित्रपटसृष्टीच्या इतिहासात एक अविस्मरणीय अध्याय जोडणार आहे.

बातमी व जाहिरातीसाठी संपर्क : 89999 48968